RNI No. MAHBIL /2009/35827

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
## भाग दोन-संकीर्ण सूचना व जाहिराती

वर्ष १२, अंक ३५]   गुरुवार ते बुधवार, ऑगस्ट २७-सप्टेंबर २, २०२६/भाद्रपद ५-११, शके १९४८   [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

### प्राधिकृत प्रकाशन

### संकीर्ण सूचना व जाहिराती

### महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

### प्रस्तावित योजनांची अधिसूचना

No. MSETCL/CO/PS/Scheme-I/RE/GN/06130.—विद्युत कायदा, २००३ च्या कलम १६४ प्रमाणे व महाराष्ट्र शासनाच्या आदेश क्रमांक ०६/ प्र.क्र.३१२/ऊर्जा/४, दिनांक २४.०८.२००६ (**शासकीय राजपत्र** पान क्रमांक २८०) नुसार, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीस प्रदान केलेल्या अधिकारानुसार, खाली नमूद केल्याप्रमाणे अति उच्च दाब पारेषण योजनेचे काम महापारेषण कंपनीच्या देखरेखीखाली करण्याचे प्रस्तावित करीत आहे. जनतेच्या माहितीकरिता ही अधिसूचना देण्यात येत आहे.

२. खालील योजना नूतनशील ऊर्जेचे निष्कासन करण्यासाठी आहे.

**योजनेचे नाव** : अकोला जिल्ह्यातील १०६, ७९, १८६ दुर्गवाडा, ता. मुर्तिजापूर येथे मे. टाटा पॉवर रिन्यूएबल एनर्जी लि. यांच्या १५० मे.वॅ. सौर ऊर्जा प्रकल्पातील विजेचे निष्कासन करणेबाबत.

**वाहिनीचे नाव** : १३२/३३ के. व्ही. दुर्गवाडा - दर्यापूर वाहिनीवर लिलो करून दुहेरी परिपथ वाहिनी दुहेरी परिपथ मनोऱ्यावर १३२ के. व्ही. सौर ऊर्जा प्रकल्प उपकेंद्रापर्यंत उभारणे - २.५ कि.मी. (OPGW सह.)

सदर वाहिनीचा मार्ग खालील महसुली गावाच्या परिक्षेत्रातून प्रस्तावित आहे.

| जिल्हा | तालुका | गावाचे नाव |
|---|---|---|
| अकोला | मुर्तिजापूर | लाखपूरी |
| | | दुर्गवाडा |

या योजनेचा अंदाजे खर्च रु. १८४१.४५ लाख इतका आहे.

३. परवानेधारक अगर हितसंबंध असलेल्या व्यक्तीने हवे असल्यास, ही सूचना प्रसिद्ध केलेल्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितच्या विचाराकरिता पारेषण कंपनीस प्रतिवेदने पाठवावीत, अशी त्यांना अधिसूचना देण्यात येत आहे. याबाबतची अधिक माहिती मुख्य अभियंता (प्रकल्प योजना), महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, ३ रा मजला, प्रकाशगंगा, प्लॉट नं. सी-१९, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१ यांचेशी वेळीच संपर्क साधून मिळू शकते.

मुंबई,
दिनांक : २० जुलै २०२६.

संचालक (प्रकल्प),
महापारेषण, मुंबई.

**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित**

**प्रस्तावित योजनांची अधिसूचना**

Ref. No. MSETCL/CO/PS/Scheme-I/RE/GN/06127.—विद्युत कायदा २००३ च्या कलम १६४ प्रमाणे व महाराष्ट्र शासनाच्या आदेश क्रमांक ०६/ प्र.क्र.३१२/ उर्जा/ ४, दिनांक २४.०८.२००६ (**शासकीय राजपत्र** पान क्रमांक २८०) नुसार, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीस प्रदान केलेल्या अधिकारानुसार, खाली नमूद केल्याप्रमाणे अति उच्च दाब पारेषण योजनेचे काम महापारेषण कंपनीच्या देखरेखीखाली करण्याचे प्रस्तावित करीत आहे. जनतेच्या माहितीकरिता ही अधिसूचना देण्यात येत आहे.

२. खालील योजना नूतनशील ऊर्जेचे निष्कासन करण्यासाठी आहे.

**योजनेचे नाव** : जालना जिल्ह्यातील किन्होळा ता. बदनापुर येथे मे. ज्युनिपर ग्रीन सिग्मा एट प्रायव्हेट लिमिटेड यांच्या ७२ मे. वॅ. सौर ऊर्जा प्रकल्पातील विजेचे निष्कासन करणेबाबत.

**वाहिनीचे नाव** : १३२ के. व्ही. राजुर उपकेंद्रापासून एकेरी परिपथ वाहिनी दुहेरी मनोऱ्यावर १३२ के. व्ही. सौर ऊर्जा प्रकल्प उपकेंद्रापर्यंत उभारणे १७ कि.मी. (OPGW सह.)

सदर वाहिनीचा मार्ग खालील महसूली गावाच्या परिक्षेत्रातून प्रस्तावित आहे.

| जिल्हा | तालुका | गावाचे नाव |
|---|---|---|
| जालना | भोकरदन | राजुर |
| | | तपोवन |
| | बदनापूर | वाघ्रुळ (दाभाडी) |
| | | चनेगांव |
| | | चिखली |
| | | वंजारवाडी |
| | | किन्होळा |

या योजनेचा अंदाजे खर्च रु. १७१०.९६ लाख इतका आहे.

३. परवानेधारक अगर हितसंबंध असलेल्या व्यक्तीने हवे असल्यास, ही सूचना प्रसिद्ध केलेल्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितच्या विचाराकरिता पारेषण कंपनीस प्रतिवेदने पाठवावीत, अशी त्यांना अधिसूचना देण्यात येत आहे. याबाबतची अधिक माहिती मुख्य अभियंता (प्रकल्प योजना), महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, ३ रा मजला, प्रकाशगंगा, प्लॉट नं. सी-१९, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई- ४०००५१ यांचेशी वेळीच संपर्क साधून मिळू शकते.

मुंबई,
दिनांक : २०.०७.२०२६.

संचालक (प्रकल्प),
महापारेषण, मुंबई,

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई

### बृहन्मुंबईतील अनेक वर्षांपासून रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील अंतिम परिशिष्ट - २ निर्गमित झाल्यानंतर त्यामधील झोपडीचे हस्तांतरण/खरेदी-विक्री करणाऱ्या झोपडीधारकांकरीता एकवेळची अभय योजना राबविण्याबाबत.....

**संदर्भ** :- शासन निर्णय क्र. विसआ-२०२३/प्र.क्र.१५९/झोपनि-२ दि.०१/१०/२०२४

क्रमांक झोपुप्रा. मुंबई/**राजपत्र**/चेंबूर/१२६ भाग / रा. न. नं. २/२०२६.—उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई येथील अंतिम परिशिष्ट-२ हे दि.०१/०१/२०११ पूर्वी निर्गमित झालेल्या योजनेची माहिती खालील परिशिष्टाप्रमाणे आहे. सदर यादीतील योजनेच्या झोपडीधारकांना उपरोक्त शासन निर्णयातील अभय योजनेचा लाभ घेता येईल.

क्रमांक क्र. झोपुप्रा. मुंबई/**राजपत्र**/चेंबूर/ १२६भाग/रा.न.नं. २/२०२६.जा.क्र. २४१५.—खालील योजनेच्या यादीतील परिशिष्ट -२ मधील ज्या झोपडीधारकांनी पुनर्वसन सदनिकेचा/गाळयाचा ताबा घेतलेला आहे, पुनर्वसन सदनिकेचे वाटप झालेले आहे अशा झोपडीधारकांना अभय योजना लागू होणार नाही.

| अ. क्र. | योजनेचे नाव | न.भू.क्र. मौजे/तालुका | योजना स्विकृत दिनांक | परिशिष्ट-II चा तपशिल | योजनेची सद्यःस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १ | राहुल नगर नं.२ सह. गृह. संस्था | मौजे - चेंबूर, ता. कुर्ला न. भू. क्र. १२६ भाग | ०३.०२.२०१० | उप जिल्हाधिकारी (अति/निष्का) चेंबूर दि. १७/१०/२००२ | योजनेस दि. २१/०३/२०११ रोजी प्रथम आशयपत्र तसेच दि.२१/१२/२०२३ रोजी सुधारित आशयपत्र दिलेले असून, सद्यःस्थितीत पुनर्वसन इमारतीत भागशः भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे. |

**स्नेहा चं. उबाळे,**
सदस्य तथा सक्षम प्राधिकारी - १०,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई.

**दिनेश महाजन**
सदस्य-सचिव तथा
कार्यकारी अभियंता एल वॉर्ड, अभियांत्रिकी विभाग,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई.

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**

दिवाणजी कॉम्प्लेक्स, अंबाजोगाई रोड

लातूर, दिनांक १३. ८. २०२६.

**चौकशीची जाहीर नोटीस**

**चौकशी अर्ज क्रमांक - २६/२०२६ कलम ७९ अ अ**

**सार्वजनिक न्यासाचे नाव- व्यंकटेश बहुउद्देशिय शिक्षण प्रसारक मंडळ, घोणसी, ता. जळकोट जि. लातूर नोंदणी क्रमांक एफ/२९५१/लातूर.**

**अर्जदार - श्री. एस. व्ही. परगे**

क्र. धउआ / ३००८/२०२६.— सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मा. धर्मादाय उप आयुक्त, लातूर विभाग, लातूर यांचे कार्यालयात महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ७९ अ अ प्रमाणे श्री. एस. व्ही. परगे यांनी न्यासाचे **परिशिष्ट एक** पुनर्लिखित करण्याकरिता अर्ज सादर केलेला आहे.

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मा. धर्मादाय उप आयुक्त, लातूर विभाग, लातूर हे वर नमूद केलेल्या न्यासाचे संबंधी व वर नमूद केलेल्या अभिलेख्या संबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ७९ अ अ अन्वये परिशिष्ट एक पुनर्लिखित करणेकामी चौकशी करीत आहेत. तरी सदर जाहिरात प्रसिध्द केल्यापासून ३० दिवसांच्या आत या कार्यालयात अर्जदाराने सादर केलेल्या रेकॉर्डचे निरीक्षण करून व त्या कागदपत्रांना हरकत असल्यास त्यांनी त्यांचेकडे असलेल्या योग्य त्या कागदपत्रासह लेखी आक्षेप नोंदवावा. सदर तारखेनंतर प्राप्त झालेल्या हरकती/आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय उप आयुक्त, लातूर विभाग, लातूर यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १३/०८/२०२६ रोजी दिली.

**अ. ह. सरोदे,**
अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
लातूर विभाग, लातूर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.